Volume - 7 (2026)
Special Issue - 1 (January)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# मराठी साहित्य आणि पर्यावरणीय दृष्टीकोन

**डॉ. प्रांजली बा. (निमसटकर)** मोरस्कर
महिला महाविद्यालय नंदनवन नागपूर
भ्रमणध्वनी क्र. : 9372717636
Email : pranjalimoraskar@gmail.com

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i1.65

---

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून मराठी साहित्य आणि पर्यावरण यांचे एक ऋणानुबंध असे नाते असल्याने साहित्यात वृक्षांची निगा कशी राखायची, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व याचे बरेचसे उल्लेख पहावयास मिळतात त्यामुळेच मराठी साहित्यातून पूर्वीपासूनच निसर्गाचे किंबहुना पर्यावरण संवर्धनाचे वर्णन करण्यात आले आहे. त्यात मुख्यतः कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन यांचा समावेश होती. तसेंच मराठी साहित्याच्या समकालीन प्रवाहात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, सीवादी साहित्य, विज्ञान साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य यांचाही समावेश होतो. परंतु त्यातही मराठी कविता ही पर्यावरण, परिसंस्था, नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरण शास्त्र याने अधिक नटलेली आहे. पर्यावरण रक्षणासाठी संपूर्ण जगामध्ये अनेक प्रकारच्या चळवळी, चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषदा आयोजित केल्या जातात., प्राचीन काळापासून मराठी साहित्यात पर्यावरण व निसर्गावर बरेचसे लेखन झाले आहे. पर्यावरणातील प्रत्येक घटक हा मनुष्याच्या जीवनाशी एकरूप झालेला आहे.

**संकेत शब्द :** मराठी साहित्य, पर्यावरणीय दृष्टिकोन, निसर्ग चित्रण, मानव-निसर्ग संबंध, पर्यावरण जाणीव.

**संत साहित्यातून व्यक्त होणारे पर्यावरण :**

मराठी संत साहित्यातून व्यक्त होणारे पर्यावरण हे तात्विक व नैतिक स्वरुपाचे आहे. तत्कालीन परिस्थितीत संतानी आपल्या अभंगाच्या माध्यमातून पर्यावरणीय परिस्थितीची कल्पना दिली होती. प्रापंचिकांना उपदेश करतांना सर्व संतांनी तत्कालीन समाज जीवनातील आजूबाजूच्या परिसरातील पशू, पक्षी, प्राणी, वनस्पती इत्यादी सहज सुंदर दाखला देत निसर्गाचे महत्त्व आपल्या अभंगातून मांडले आहे. माणसाला निर्भेळ जीवन जगण्यासाठी शुध्द निसर्गाची साथ हवी अशीच त्यांची धारणा होती. संत ज्ञानेश्वरांनी संत तुकारामानी, रामदासानी आणि संतवाटीकेतील वेगवेगळ्या संतानी आपल्या अभंगात पर्यावरणाचे महत्व विषद केले. समाजाचा शाश्वत विकास झाला पाहिजे आणि पर्यावरणाचा समतोलही राखला पाहिजे नाहीतर मानव जीवनाची, संस्कृतीची अपरिमित हानी होईल याचे चित्रणही ते अभंगातून करतात. संत ज्ञानेश्वर म्हणतात,

'नगरेचि रचावी। जलाशये निर्मावी।महा वने लायावी ।। नाना विधे ।।'

मानवाला राहण्यासाठी वस्ती हवी म्हणून नगर बसवावे तळे निर्माण करावे आणि उद्याने व जंगल निर्माण

करावे जेणेकरुन निसर्गाचा समतोल राखला जाईल जिथे नैसर्गिकता संपते तिथे प्रदूषणाला सुरुवात होते.तसेंच ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्ययात निसर्गाचे वर्णन केले आहे.

जेथे अमृताचेनि पाडे | मुळेही सकट गोडे । जोडती दाट
झाडे सदा फळती ||
पाऊला पाऊला उदके | वर्षा काळीही परिचोचे । निधरि का विशेखे सुलभ जेय ।

निसर्गाच्या सनिध्यात सर्वांपासून दूर जंगलात माणसाचे मन शांत होते. माणूस स्वतःशी संवाद साधू शकतो.ज्या वृक्षवेलीचे रक्षण पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक आहे ते होत नाही. याचे उदा. देताना संत तुकारामानी म्हटले आहे.,

'तोडूनि पुष्पवाटीका। फळवृक्षयाती । बाभळा राखिती करुनि सार ।।
कोण हित तेणे देखिले आपुले ।आणिके पाहिले सुख काई ।।
तुका म्हणे त्यास नाई के सांगता ।तया हाल करिता पाप नाही ।।'

वृक्षतोड करुन मानवी हीत साधणार नाही. पृथ्वीतलावरील अलौकिक अशी देण असलेली जंगल तोडून मानवी जीवन विनाशाकडे जात आहे. पूर्वीच्या काळी प्राणी जंगल आणि मानवी जीवन यंचा मेळ बसलेला होता. एक गोष्ट नष्ट करुन दुसरी निर्माण करून त्याचा उपयोग केला जायचा पण आता एक वस्तूच्या निर्मितीसाठी चार प्रकारचे प्रदूषण करुन मानवाने पर्यावरणाचा -हास केलेला आहे.तसेंच पर्यावरणाचे महत्व विषद करतांना संत तुकारामानी आपल्या अभंगातून म्हटले आहे. की,

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ।पक्षी ही सुरवरे आळविती ।।

वृक्ष, वेली आणि झाडे वनात चरणारे प्राणी आणि जंगलात वावर करणारे पक्षी सुस्वद कंठाने गाणी गातात ही वृक्ष म्हणजे आमच्या घरी असलेली पाहूणे आहेत. आणि नेहमी त्याचं स्वागत केले पाहिजे. तरच निसर्गाचा समतोल राखला जाईल तुकाराम महाराज म्हणतात की, झाडावेलीच्या सहवासातून गेलं की माणूस स्वतःशी संवाद करु लागतो अंतर्मुख होऊन बाहयदोष निवारण होतात. संत साहित्यातील संत तुकाराम आणि संत नामदेव यानी आपल्या अभंगातून तुलसी महात्म्याचे वर्णन केले आहे. या संदर्भात संत तुकोबा आपल्या एका अभंगात म्हणतात.,

"आम्ही मोहरांचे अलंकार आहोत, तुळशीचे हार आहोत, आमच्या बाहूंचे हार आहोत"
तर संत नामदेवराय आपल्या अभंगात तुळशीचे वर्णन करताना म्हणतात;
"तुलसी मंजिरीचे भाले। देखोनी यमदूत पाले"

संत नामदेव तुळशीला औषधी वनस्पती असे म्हणतात. ती विष्णूलाही प्रिय आहे. साक्षात पांडुरंग ही तुळशीमाळ गळयात पालून विटेवर दिमाखात उभा आहे. तुळशीमाळा पालूनी कंठी, उभा विटेवरी जगजेठी' याप्रमाणे तुळशीचा महिमा सर्वत्र वरून वर्णन केला जातो. वसुंधरा हा निसर्ग जपणे जाणणे आणि त्यात वाढ करणे

हे मानवी कर्तव्य आहे. समर्थ रामदासानीही आपल्या दासबोधामध्ये सांगितले की,

वल्लीमध्ये जीवन। नाना फळी फुली जीवन
दासबोध नाना कंदमुळी जीवन । गुणकारके

अनेक वृक्षामध्ये औषधी आहे. जलतत्व आहे. परंतु मानवी गरजेमुळे आणि अज्ञानामुळे अशा औषधिक वनसंपत्तीचा हास होतो आहे. झाडे तोडल्यामुळे पाऊस पडत नाही. पाऊस नसल्यामुळे पृथ्वीवर उष्णतेचा कहर होतो. आणि पर्यावरण समतोल बिघडतो. हे त्याकाळी रामदासानी दासबोधात स्पष्ट केलेले आहे. ते पुढे म्हणतात,

शतरुपे मेघ जाती । तेथे प्राणी मृत्यु पावती
असंभाव्य तडके क्षिती मर्यादे वेगळी ॥
होळी ।
सूर्य तो बारा कळी। तेणे पृथ्वीची होय
अग्नी पावतां पाताळी। शेष विष वमी ।
सूर्यास खडतरता चढे । हल्लकल्लोळ चहूकडे ।
कोसळती मेरुचे कडे। घडाघडायमान

संत रामदासानी पर्यावरणाचे महत्व अभंगाच्या माध्यमातून केले. सर्व संत महात्म्यांनी पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मराठी काव्यात आपल्या ओवी, अभंग, श्लोक, पदे, गीतकाव्य रचना यांच्या माध्यमातून पर्यावरणाचे महत्व सांगितले आहे.

**मराठी कवितेतून व्यक्त होणारे पर्यावरण :**

मराठी साहित्यात कवितेत निसर्गकविता मोठ्याप्रमाणात केलेल्या दिसतात. निसर्गकविता म्हटले बालकवीची फुलराणी कवितेतील ,

हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालीचे.....

ह्या ओळी निसर्गातील घटकांना सजीव रूप प्राप्त करतो. बालकवींना नैसर्गिक पर्यावरणाचे अग्रदूत मानावे लागते. निसर्ग प्रतिमांचे संमेलनच भरलेले आहे. निसर्गाशी मनसोक्त क्रीडा करु लागत आणि निसर्गाशी त्यांचे एक तादात्म्य निर्माण होत." बालकवींच्या निसर्गातील या तादात्म्यातूनच, 'तडाग असती तर', 'श्रवणमास', 'फुलराणी', 'औंदुबर', 'तू तर चाफेकळी', 'निर्धारास', 'बालविहग', 'पाखरास', 'पारवा' इ. अजरामर कविता निर्माण झाल्या. या सर्व कवितांमध्ये नैसर्गिक पर्यावरणाचा आविष्कार अत्यंत तरल आहे. बालकवी म्हणजे निसर्ग व निसर्ग म्हणजेच बालकवी असे या दोघांचे अद्वैत आहे. पर्यावरणीय संवेदनात बालकवींचा क्रमांक फार वरचा आहे.कविश्रेष्ठ कुसुमाग्रज 'मराठीपण' या कवितेत म्हणतात,

माझं मराठीपण मी शोधलं,
सहयाद्रीच्या डोंगरात,
संतांच्या शब्दात
इतिहासाच्या पानात,
- तेव्हा सारीजणं हसून म्हणाली,
"आम्ही शोधलं आमचं मराठीपण
या भूमिवरच्या माणसांच्या मनात
त्यांच्या जखमांत, त्यांच्या रक्तात
ज्यांतून उसासतात सूर्याचे किरण,
मराठीपण ओलांडून
साऱ्या आकाशाला गवसणी घालणारे.....!"
विंदा करंदीकर म्हणतात,
हिरव्या पिवळ्या माळावरुन
हिरवी पिवळी शाल घ्यावी,
सहयाद्रीच्या कड्याकडून
छातीसाठी डाल घ्यावी,

कुसुमाग्रज, विंदा करंदीकर यांच्यावरील कविता नैसर्गिक पर्यावरणाशी नाते जैविक गरजा भागविण्यासाठी असतात, असे सूचित करतात. गोविंदाग्रजांची 'प्रेम आणि मरण', माधव ज्युलियनांची, 'संगमोत्सुक डोह, कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' या व यासारख्या कविता नैसर्गिक अनुभूती देणाऱ्या आहेत. केशवसुत यांनी पर्यावरणीय संवेदनात सामाजिक उद्बोधनाचा सूर उमटवला. या निसर्ग कवितेच्या आधारे नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेण्याचा प्रयत्न माधव ज्युलियन, बा.सी.मर्ढेकर, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगावकर, ना. धो. महानोर, इंद्रजीत भालेराव, इंदिरा संत, अनुराधा पोतदार, शरणकुमार निंबाळे इत्यादी यासारख्या कवींच्या कवितेमधून व्यक्त होताना दिसतो. महानोर हे निसर्गाशी ,रानांशी भावनिक नाते सांगतात.'नभ आणि भुई यांचा संबंध व्यक्त करताना ते म्हणतात,

"ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
ह्या मातीतून चैतन्य गावे"

निसर्ग आणि मानव यांचे भावनिक नाते इथे दिसते. महानोर यांनी आपल्या काव्यातून निसर्गाचे अस्सल दर्शन घडवलेले आहे.

इंद्रजीत भालेराव यांच्या 'पीकपाणी' या काव्यसंग्रहातून नैसर्गिक पर्यावरणाचे अस्सल रूप साकारलेले आहे. शेतक:याच्या जीवनातील निसर्गाला विशेष महत्व आहे. निसर्ग हा लहरी आहे त्याचे परिणाम मानवी

जीवनावर होत असतात. निसर्गाच्या या लहरीपणाविषयी कवी म्हणतात,' व-ही बसलय हाटून खाली फुलोऱ्यात धान आर्थ आनं रे आभाळ 'भालेरावांनी आपल्या कवितेतून निसर्गाचा लहरीपणा, गाय आणि निसर्ग यांचे अतूट नाते, शेतकयांच्या जीवनात निसर्गाचे स्थान, कृषीसंस्कृती, दुष्काळ, ऋतुचक यांचे वर्णन केलेले आहे. अनुराधा पाटलांच्या कवितेत विशेषतः पाऊस आभाळ या निसर्ग घटकांना विविधरंगी प्रतिमांचे रूप येते, आभाळ, माती, वारा,निसर्ग याची विविध साथ कवयित्रीला लाभलेली दिसते. एकूणच कवितेच्या माध्यमातून समाजाला पर्यावरण जाणीवजागृती करण्याचे काम अलीकडच्या मराठी कवींनी केलेले दिसून येते.

**मराठी कथेतून व्यक्त होणारे पर्यावरण :**

कथा साहित्यात मुख्यतःग्रामीण परिसरातले नैसर्गिक पर्यावरणाचे विविध चित्रण झालेले दिसते.ग. ल. ठोकळ पांच्यापासून निसर्गाचे वर्णन कथेत आलेले दिसत असले तरी, मराठी कथेतील निसर्गचित्रण अधिक कलात्मक झाले ते व्यंकटेश माडगूळकरांपासून 'वाटा' व 'गोष्टी घराकडील या त्यांच्या लेखातून ते चित्रित होताना दिसते. याशिवाय उद्धव शेळके, आनंद यादव, यासारख्या लेखकांच्या कथा माध्यमातून निसर्ग वर्णन आलेले आहे. मारुती चित्तमपल्ली यांच्या 'रानवाटा' तून जंगल संस्कृती, विविध प्रकारचे पशु-पक्षी यांचे सूक्ष्म निरीक्षण नोंदवले आहे. निसर्गाचे मनोहारी व सुंदररूप वर्णन करण्याबरोबरच, निसर्गाचे रौद्ररूपसुद्धा साकारलेले आहे. 'पाणी पाणी' या कथेतून पाणी प्रश्नावर चिंतन केलेले आहे. पाण्याच्या वापरा संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत. मराठी कथेतील काही नवलेखकांनी सामाजिक परिस्थितीचे भान राखत पर्यावरण व त्याचे संवर्धन यासारख्या विषयाला महत्त्व देऊन समाज जागृतीचे काम करताना दिसून येतात.

**मराठी कादंबरीतून व्यक्त होणारे पर्यावरण :**

मराठी साहित्यातील कादंबरीत प्रामुख्याने विश्वास पाटील, रा.र. बोराडे, शंकर सखाराम, आनंद यादव, उद्धव शेळके, बंकट पाटील, सदानंद देशमुख आदी साहित्यिकांनी नैसर्गिक पर्यावरणासंदर्भात लेखन केलेले दिसून येते. रा.र.बोराडे यांची 'इथे होते एक गाव' या कादंबरीतून भूकंपग्रस्तांचे जीवन साकार झालेले आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' मधून यंत्रसंस्कृतीमुळे कृषी संस्कृतीचा हास होत चाललेला आहे असे वर्णन केलेले दिसते, विश्वास पाटील यांच्या 'पागीरा' मधून 'पाणी म्हणजे जीवन' तेच जर नष्ट झाले तर काय होईल यावर भाष्य केलेले आहे.मराठी साहित्यातीन नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेत असताना लक्षात येते की कृषी संस्कृतीचा होणारा ऱ्हास लोपपावत चाललेली ग्रामसंस्कृती, निसर्गात घडणारे नाव्यपूर्ण बदल, सतत बदलणारे ऋतुचक, निसर्गाचा लहरीपणा, शहरीकरणाच्या आधुनिकीकरणामुळे निसर्गाचा होणारा ऱ्हास आदी बाबींचे चित्र मराठी कादंबरीच्या माध्यमातून व्यक्त केलेली दिसून येते.

**निष्कर्ष :**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे तर निसर्ग हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे.मराठी साहित्यात पर्यावरणाचे विविध पदर पाहायला मिळतात. संतसाहित्यातून जैवविविधता आणि भूतदया ,कवितेतून बालकवी,बी,ना.धो.महानोर,इ. नी निसर्ग सौंदर्याकडून पर्यावरणाकडे, तसेंच कथा -कादंबरीतून आनद

यादव,व्यंकटेश माडगुळकर,रा.र.बोराडे इ.नी ग्रामीण जीवन आणि निसर्गाचा ऱ्हास इ.विषयांचे पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्व विशद करताना दिसून येतात. पर्यावरणीय समस्यांची तीव्रता कमी करण्याचा साहित्यातून सतत प्रयत्न होताना दिसतो. नैसर्गिक पर्यावरणीय साधनसंपत्तीचा सदुपयोग व उपभोग मानवाने जरूर घेतला पाहिजे. ही नैसर्गिक साधनसंपत्ती मानवाला कृतज्ञतेच्या भावनेतूनच परोपकारार्थ निसर्गतःच देणगीच्या रूपाने मिळाली आहे. आपल्या समृध्द जीवनासाठी त्याचा उपयोग मानवाने करून घेतांना निसर्गाचे, पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनही केले पाहिजे. पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन काळाची गरज बनले आहे.ह्याच जाणीवेने मराठी साहित्यात पर्यावरणीय दृष्टिकोनातून मानवाला संदेश देण्यात आला आहे.

**संदर्भ सूची :**

- प्रा. जाधव रा. ग. पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन, 1996, नागपूर
- संत तुकाराम श्री तुकाराम महाराजाची गाथा गीताप्रेस गोरखपूर, चौथी आवृत्ती, पृ.क्र. 145
- माडगुळकर व्यंकटेश,बनगरवाडी, मौज प्रकाशन गृह, मुंबई
- चितमपल्ली मारुती, निसर्गवाचन, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
- लिंबाळे शरणकुमार,मराठी वांग्मयातील नवीन प्रवाह, मधुराज प्रकाशन, १९९३ पुणे
- कुलकर्णी वा.ल ,’मराठी कविता जुनी आणि नवी ‘पोपुलर प्रकाशन, मुंबई १९०१
- ठाकरे वसंत ,पर्यावरण जाणीव विकास, साकेत प्रकाशन, पुणे २०१२